SHRI SANT DNYANESHWAR BAHUUDDESHIYA MANDAL, DHABA

SHRI DHABEKAR KALA MAHAVIDYALAYA

Khadki (Cha), Post. Gandhi Nagar, Akola - 444 004

(Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati)

- **NAAC** Accredited **'B'** Grade
- **College Code :** 233
- **Website :** www.dkmkhadkiakola.edu.in
- **Email ID :** sdkm233@sgbau.ac.in



PROSPECTUS

2026-2027

आमचे प्रेरणास्थान



सन्माननिय

श्री अनिलभाऊ पाटील धाबेकर

अध्यक्ष

श्री संत ज्ञानेश्वर बहुउद्देशिय मंडळ,

धाबा

आमचे मार्गदर्शक



माननिय

श्री सिद्धार्थभाऊ पाटील

सचिव,

श्री संत ज्ञानेश्वर बहुउद्देशिय मंडळ,

धाबा

आमचे प्राचार्य



डॉ. संजय व्हि. देशमुख
प्राचार्य
श्री. धाबेकर कला महाविद्यालय,
खडकी, अकोला

Facilities for Student's

- Highly Educated Teaching Staff
- High Academic Standards
- Library Facilities
- Research Facilities
- Computer Literacy Programme
- Wi-Fi Campus
- Anti Ragging Committee
- Student Friendly Environment
- Easy Admission Process
- Alumni Association
- Grievance and Redressal Cell
- Sports / Extra Curricular Activities
- NSS Unit For Student
- E- Library Facilities for Students

Sant Dnyaneshwar BahuuddeshiyaMandal

Dhaba, Tq. Barshitakali Dist. Akola

No.	Full Name	Designation
1	Shri. Anil Keshavrao Dhabekar	President
2	Shri. Harshal Anil Patil	Vice- President
3	Shri. Siddharth Anil Patil	Secretary
4	Shri. Sunil Keshavrao Dhabekar	Member
5	Smt. Lata Anil Patil	Member
6	Smt. Jyoti Dinkar Kadu	Member
7	Shri. Wamanrao Daulatrao Tapre	Member

Sant. Dnyaneshwar BahuuddeshiyaMandal,

Dhaba, Tq. Barshitakali Dist. Akola

College Development Committee

No.	Full Name	Designation
1	Shri. Anil Keshavrao Dhabekar	President
2	Shri. Siddharth Anil Patil	Member
3	Prof. Amrish S. Gawande	One H.O.D.
4	1) Dr. Neeta N. Tiwari 2) Dr. Suresh L. Pandit 3) Dr. Santosh S. Misal	Three Teacher Representative in the college
5	Shri. Manoj B. Nandanpure	One Non-Teaching Employee
6	Shri. Shankarrao Langote (Social Service) Shri. Gajananrao Hundiwale (Industry) Pri. Dr. Devendra Gawande (Research) Pri. Dr. Sagar Narkhede (Education)	Member Member Member Member
7	Prof. Rahul P. Ghuge	IQAC Co-ordinator
8	1) 2)	Student Representative
9	Dr. Sanjay V. Deshmukh	Principal (Member Secretary)

महाविद्यालया विषयी

श्री. संत ज्ञानेश्वर बहुउद्देशीय मंडळ, धाबा यांच्या द्वारा श्री. धाबेकर कला महाविद्यालय २८.०६.२००० रोजी धाबा येथे सुरू करण्यात आले. ग्रामीण भागातील शिक्षणाच्या विकासासाठी श्री. संत ज्ञानेश्वर बहुउद्देशीय मंडळ, धाबा चे अध्यक्ष व संस्थापक सदस्य यांनी मागासलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन समाजासाठी काही तरी उपयुक्त कार्य करण्याचे ध्येय ठेवून सुरू करण्यात आले. महाविद्यालयाच्या आजूबाजूचा परिसर हा प्रामुख्याने शिक्षण आणि आरोग्याच्या बाबतीत मागासलेला असल्याने लोकांची ही अवस्था पाहून श्री. संत ज्ञानेश्वर बहुउद्देशीय मंडळाने लोकांना उच्च शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला फक्त ८८ विद्यार्थी प्रवेशित होते पण वेळ आणि प्रामाणिक प्रयत्नांनी महाविद्यालयाने लोकांचा विश्वास संपादन केला. लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून श्री. संत ज्ञानेश्वर बहुउद्देशीय मंडळाच्या व्यवस्थापकीय मंडळाने समाजाला अधिक शिक्षण देण्यासाठी अकोला

शहराजवळील खडकी येथे महाविद्यालय स्थलांतरित करण्याचा निर्णय घेतला. ०८.०६.२००९ पासून श्री. धाबेकर कला महाविद्यालय, खडकी येथे हलविण्यात आले आणि विद्यार्थ्यांच्या विकासासाठी त्यांनी अमूल्य सेवा दिली. कला शाखेत कार्यरत असलेल्या आणि ८८ विद्यार्थ्यांसह सुरू झालेल्या महाविद्यालयात आता २३४ विद्यार्थी असून ०८ ऐच्छिक विषय आहेत जे आजूबाजूच्या परिसरातील तरुणांना ३६० डिग्री वृत्ती देणारे आहे. सध्या आमच्याकडे उच्च शिक्षित आणि गुणवत्तेसह संपूर्ण शिक्षक कर्मचारी आहेत तसेच सुशिक्षित आणि जबाबदार शिक्षकेतर कर्मचारी कोणत्याही तांत्रिक अडचणी सोडवण्यासाठी तयार आहेत. संस्थेची इमारत आहे ज्यामध्ये खेळाचे मैदान, प्रदूषित नसलेले पर्यावरणपूरक वातावरण, सुव्यवस्थीत वर्ग खोल्या, सुसज्ज प्रयोगशाळा आणि पुस्तकांचे वाचनालय आहे. महाविद्यालय संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्याशी संलग्न आहे. आमच्या महाविद्यालयास NAAC मूल्यांकन समितीकडून 'B' ग्रेड मिळाला असून आता आम्ही संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारे कायमस्वरूपी संलग्नता मिळवण्याचा निर्णय घेतला असून त्या नंतर आम्ही 2F 12 B करण्याची प्रक्रिया करणार आहे.

Vision :

* To create effective learning environment
* To Import student quqlity learning

Contribution for youth Development and Progress of socially and economically backward class student for progress of Nation.

Mission :

1. To provide education to Students on Social norms to Development of Society.
2. To provide Library services to face challenges in competitive Examinations.
3. To Develop Moral Norm: & views of nation Development in Youth in Rural Area.
4. Give Strong Support to develop Education for Backward class for their all round Development by the Institution.

Institutional Strength

1) College has eco friendly campus with garden with 8000sq.ft. land.
2) It has Highly Qualified Faculties with 6 Ph D, 6 M.Phill. holder and 2 NET/SET Qualified.
3) Regularly organized Social Awareness program in neighbouring area.
4) We have Unit of 100 volunteers of NSS.
5) We have two self financed Subject for development of Student.
6) Women Empowerment and Grievance cell.
7) We provide no of various Scholarship for economically backward Student.
8) Adequate Sports Facilities for Indoor and Outdoor Games

Teaching Faculty Record

Sr. No.	Name Of Faculty			Department	Designation	Mobile No.	Educational Qualification
	Name	Middle Name	Surname				
1	Dr. Rekha	Digambar	Adhav	Marathi	Proffesor	9850156255	M.A.(Marathi), NET, Ph.D.
2	Dr.Neeta	Nandalal	Tiwari	Economics	Proffesor	9923036126	M.A. (Economics), M. Phill.,Ph.D.
3	Dr. Suresh	Laxamnrao	Pandit	History	Asso. Professor	9850061391	M.A. (History), SET, Ph.D.
4	Dr. Sangita	Nilkanth	Lohakpure	Phy. Education	Asso. Proffesor	9405169511	M.P ed, Ph.D.
5	Dr. Santosh	Sadashiv	Misal	Pol. Science	Asso.Professor	9403620831	M.A. (Pol. Science), M. Phill.,Ph.D.
6	Dr. Amrish	Shrikrishna	Gawande	Sociology	Asso. Proffesor	9822930511	M.A. (Socilogy, Pol. Sci.), M. Phill. Ph.D.
7	Mr. Rahul	Pandhari	Ghuge	English	Assist. Professor	9970147669	M.A. (English), M. Phill.
8	Mr. Siddharth	Anil	Patil	Library	Asso. Professor	9422160600	M.Lib., M.Phill.

Non Teaching Staff Details

Sr. No.	Name Of Faculty			Designation	Mobile No.	Educational Qualification
	Name	Middle Name	Surname			
1	Mr. Manoj	Bapurao	Nandapure	Head Clerk	7057791594	M.A., B.Ped
2	Mr. Santosh	Ramdas	Jamode	Sr. Clerk	9922034701	12^{th}
3	Mr. Sheshrao	Makharam	Jadhao	Lib. Attendant	9765020920	12^{th}
4	Mr. Mahadeo	Sakharam	Galat	Peon	7888216988	9^{th}
5	Mr. Sudhakar	Gorsu	Chavan	Peon	7972740197	12^{th}
6	Mr. Anil	Pundlik	Kharat	Peon	9049130863	12^{th}
7	Mr. Shashikant	Narayan	Jamnik	Peon	9823337684	12^{th}

Shri. Dhabekar Kala Mahavidyalaya, Khadki, Akola

Prospectus Committee 2025-26

Sr.No.	Full Name	Designation
1	Prof. Amrish Gawande	Co-ordinator
2	Prof. Rahul Ghuge	Member
3	Shri. Manoj Nandapure	Member
4	Shri. Santosh Jamode	Member

College Committee 2025-26

Committee	Chairman	Co-ordinator	Member
Steering Committee	Dr. Sanjay V. Deshmukh	Prof. Rahul Ghuge	Shri. Anilbhau Dhabekar Prof. Siddharth Patil Dr. Santosh Misal
Admission Committee	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Neeta Tiwari	All Staff Members
Time Table	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Suresh Pandit	Dr. Amrish Gawande Dr. Rekha Adhao
Examination	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Rekha Adhao	Dr. Suresh Pandit
Prospects Committee	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Amrish Gawande	Prof. Rahul Ghuge Dr. Sangita Lohakpure Shri. Manoj Nandapure
Girls Grievance & Guidance Committee	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Neeta Tiwari	Dr. Rekha Adhao Mr. Manoj Nandapure
Magazine Committee	Dr. Sanjay V. Deshmukh	Prof. Rahul Ghuge	Dr. Santosh Misal Dr. Amrish Gawande Dr. Rekha Adhao
Anti raging & Discipline Committee	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Neeta N. Tiwari	Dr. Suresh Pandit Mr. Manoj Nandapure
Carrier Guidance Cell	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Rekha Adhao	Prof. Rahul Ghuge Dr. Santosh Misal

Committee	Chairman	Co-ordinator	Member
Website Committee	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Amrish Gawande	Prof. Rahul Ghuge Shri. Monoj Nandapure
Budget /Purchase Committee	Dr. Sanjay V. Deshmukh	Prof. Siddharth Patil	Shri. Manoj Nandapure Shri. Sheshrao Jadhao
Cultural Committee	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Suresh Pandit	Dr. Neeta Tiwari Dr. Santosh Misal
Affiliation Committee	3r. Sanjay V. Deshmukh	Prof. Rahul Ghuge	Dr. Amrish Gawande Prof. Siddharth Patil Mr. Manoj Nandapure
SC/ST Committee	Dr. Sanjay V. Deshmukh	Prof. Rahul Ghuge	Dr. Amrish Gawande Dr. Santosh Misal
Teaching Evaluation	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Neeta Tiwari	Prof. Rahul Ghuge Dr. Santosh Misal
Library Advisory	Dr. Sanjay V. Deshmukh	Prof. Siddharth Patil	Dr. Sangita Lohakpure Shri. Sheshrao Jadhao
Student Counselling	Dr. Sanjay V. Deshmukh Dr. Suresh Pandit	Dr. Amrish Gawande	Dr. Santosh Misal
Student Evaluation	Dr. Sanjay V. Deshmukh	Prof. Rahul Ghuge	Dr. Rekha Adhao Dr. Santosh Misal

Committee	Chairman	Co-ordinator	Member
N.S.S.	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Santosh Misal	Dr. Sangita Lohakpure
Alumni Association	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Suresh Pandit	Prof. Rahul Ghuge Dr. Amrish Gawande
Sport Committee	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Sangita Lohakpure	Prof. Rahul Ghuge Mr. Manoj Nandapure
Grievance Redressal Cell	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Neeta Tiwari	Dr. Suresh Pandit Dr. Amrish Gawande Prof. Rahul Ghuge Mr. Manoj Nandapure
Student Feedback Committee	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Sangita Lohakpure	Dr. Suresh Pandit Prof. Siddharth Patil

Committee	Chairman	Co-ordinator	Member
IQAC	Dr. Sanjay V. Deshmukh	Prof. Rahul Ghuge	Dr. Neeta Tiwari Dr. Amrish Gawande
Environment Committee	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Neeta N. Tiwari	Dr. Amrish Gawande Mr. Santosh Jamode
Student Placement Cell	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Sangita Lohakpure	Dr. Suresh Pandit
Student Development Committee	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Santosh Misal	Dr. Sangita Lohakpure Dr. Suresh Pandit
Student Grievance Committee	Dr. Sanjay V. Deshmukh	Dr. Sangita Lohakpure	Dr. Suresh Pandit Shri. Manoj Nandapures

Session 2026-27

- Students Fees -

No.	Item / Head	B.A.I	B.A.II	B.A.III	No.	Item / Head	B.A.I	B.A.II	B.A.III
1	Tution Fee	800	800	800	18	e-Suvidha	12	12	12
2	Prospectus	24	24	24	19	Corpus Fund	12	12	12
3	Library Fees	194	194	194	20	Annual Fee	103	103	103
4	Gymkhana Fee (Game & Sports)	200	200	200	21	University Sports Fund	200	200	200
5	Co-curricular	103	103	103	22	University Aswamegh Fee	36	36	36
6	Physical Efficiency Test	36	36	36	23	Medical Examination	67	67	67
7	Vehicle Stand	73	73	73	24	Students Welfare Fund	75	75	75
8	Security	73	73	73	25	Students Council	25	25	25
9	Green & Smart Campus Fees	12	12	12	26	Emergency Fund	50	50	50
10	Facility Fee	103	103	103	27	Uni.Students Insurance Fund	40	40	40
11	Student Development Fund	12	12	12	28	Youth Festival	13	13	13
12	College Examination	145	145	145	29	Student ID Card	43	43	43
13	Study Tour (Excursion /	121	121	121			**2844**	**2699**	**2699**
	Industrial Tour/Field visit)					Environmental Studies	-	194	-
14	College Magazine	103	103	103		Degree Certificate fee			500
15	e-Suvidha (Com T.F.)	12	12	12		Career Katta (optional)	365	365	365
16	Enrollement Fee	145	-	-		University Exam Fee (Per Semi.)	315	315	315
17	Sant Gadge Baba Studies Fund	12	12	12					

टिप : १) काही कारणार्थ फी मध्ये विद्यापीठ व शासनाने वाढ केल्यास ती वाढ फी मध्ये लागु राहील.,

२) ॲडमिशन तारखेपासून १० दिवसाचे आत ॲडमिशन काढुन नेली तर पूर्ण फीच्या २५ टक्के प्रवेश शुल्क व शिक्षण शुल्क भरावे लागेल.

३) ॲडमिशन तारखेपासून ११ ते २० दिवसांच्या आत ॲडमिशन काढुन नेली तर ५० टक्के प्रवेश शुल्क व शिक्षण शुल्क भरावे लागेल.

४) ॲडमिशन तारखेपासून २० दिवसानंतर ॲडमिशन काढुन नेली तर पूर्ण फि भरावी लागेल.

शुल्काबाबत सूचना :

* विद्यापीठ किंवा शासनाद्वारे शुल्कामध्ये काही बदल झाल्यास संबंधित सूचना फलकावर लावण्यात येईल. * बी.ए. च्या विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क परीक्षा आवेदन पत्र भरते वेळीच घेण्यात येईल.
* विद्यार्थी जो शुल्क भरणा करतील तो, त्या सत्रापुरताच असेल. * कोणत्याही विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीने महाविद्यालय मधेच सोडल्यास त्याला किंवा तिला वर्षाची पूर्ण फी भरावी लागेल.
* बि.ए. भाग-२ च्या विद्यार्थ्यांना पर्यावरण शास्त्राचे शुल्क भरणे अनिवार्य राहील.

❊ महत्वाचे नियम ❊

- ❊ विद्यापीठ, शासन किंवा व्यवस्थापन समिती यांनी घालून दिलेल्या नियमानुसार प्रवेश दिल्या जाईल.
- ❊ शासन, विद्यापीठ किंवा व्यवस्थापन समिती यांना प्राप्त झालेल्या सूचनेनुसार प्रवेश पध्दतीमध्ये बदल करण्याचा अधिकार मा. प्राचार्यांना राहील. या संबंधीत सूचना महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात येतील. प्रवेश घेण्यापूर्वी फलकावर विद्यार्थ्यांनी ह्या सूचना वाचाव्यात.
- ❊ माहिती पत्रकातील प्रवेश अर्ज विद्यार्थ्याला अचूक व सुवाच्च अक्षरात भरून प्रवेश समितीकडे सादर करावा, प्राचार्याच्या मंजुरी शिवाय प्रवेश निश्चित होणार नाही.
- ❊ प्रवेश अर्ज पूर्ण कागदपत्रांशिवाय निश्चित होणार नाही. प्रवेश अर्जामध्ये जात व वर्गवारीचा स्पष्ट उल्लेख करावा.
- ❊ जी बाब लागू नसेल तेथे (नाही) असे लिहा. प्रवेश अर्ज भरतांनाही काही अडचणी आल्यास प्रवेश समितीकडे विचारणा करावी.
- ❊ प्रवेश प्रक्रियेचा नियोजीत कार्यक्रम सूचना फलकावर लावण्यात येईल. प्रवेश पात्रता राज्य सरकार, महाराष्ट्र राज्य, अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी ठरवुन दिलेल्या नियमानुसार राहील.
- ❊ विद्यार्थ्यांना दिलेला प्रवेश तात्पुरत्या स्वरूपाचा राहील. विद्यापीठ अनुमती मिळाल्यानंतर प्रवेश निश्चित करण्यात येईल.
- ❊ शाळा सोडल्याचा दाखला (टि.सी.) च्या दुय्यम प्रतिवर प्रवेश देण्यात येणार नाही.
- ❊ कोणत्याही वर्गामध्ये एक वेळ प्रवेश निश्चित झाल्यानंतर विषया मध्ये बदल करता येणार नाही.
- ❊ अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा त्याच वर्गात पुनर्प्रवेश मिळणार नाही.
- ❊ प्रवेशा संबंधीच्या सर्व बाबी प्रवेश समिती हाताळेल. विद्यार्थी व पालकांनी कार्यालयीन वेळेत समितीशी संपर्क साधावा.
- ❊ शिक्षण उपसंचालक अमरावती व सं. गा. बा. अमरावती विद्यापीठ यांनी ठरवून दिलेल्या तारखेनंतर प्रवेश दिला जाणार नाही.
- ❊ प्रवेश निश्चित झाल्यावर सात दिवसाच्या आत फी माफीचा अर्ज सादर करावा लागेल.
- ❊ प्रवेश निश्चितीनंतर स्वतःहून प्रवेश नाकारल्यास भरलेले शुल्क (रक्कम) परत मिळणार नाही.
- ❊ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या मालमत्तेचे नुकसान केल्यास त्याचे कडून नुकसान भरपाई करून घेण्यात येईल.
- ❊ महाविद्यालयात कोणताही कार्यक्रम घ्यावयाचा असल्यास त्यासाठी प्राचार्याची पूर्व परवानगी घ्यावी लागेल.
- ❊ प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयातील कमीत कमी एका उपक्रमात भाग घेणे अनिवार्य राहील.

परीक्षा :

प्रत्येक विद्यार्थ्याला चालु शैक्षणिक सत्रामध्ये चार घटक चाचण्या, प्रथम व द्वितीय सत्रांत परीक्षा देणे आवश्यक आहे. जो विद्यार्थी वरील परीक्षेमध्ये अनुपस्थित राहिल त्याला विद्यापीठीय अंतिम परीक्षेकरीता दंड भरावा लागेल.

नामांकन : बी.ए. भाग १ मध्ये प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांना प्रवेश घेतांना नामांकन अर्ज व नामांकन शुल्क भरून विद्यापीठामध्ये आपले नाव नोंदवून घ्यावे लागेल.

विषय : इंग्रजी, मराठी, इंग्रजी साहित्य, मराठी साहित्य, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, संगित, गृहअर्थशास्त्र

टिप : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (**NEP-2020**) नुसार असणारे विषय सर्वांना अनिवार्य असतील.

ओळखपत्र :

१) प्रवेश निश्चितीनंतर प्रत्येक विद्यार्थ्यांना महाविद्यालयाकडून ओळखपत्र दिल्या जाईल.

२) प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपले स्वतःचे ओळखपत्र खालील वेळी सोबत ठेवावे.

अ) महाविद्यालय परिसरामध्ये वावरतांना.

ब) तासिका, परीक्षा किंवा महाविद्यालयातील कोणत्याही कार्यक्रमाला उपस्थित असतांना.

क) शिष्यवृत्ती, ग्रंथालयातील पुस्तक घेतांना, एस.टी. किंवा महाविद्यालयीन बसमध्ये प्रवेश करतांना व इतर कोणतेही दाखल मागतांना.

ड) शैक्षणिक, सहल, खेळ किंवा इतर कुठल्याही कार्यक्रमात भाग घेतांना इ. प्रसंगी महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी मागणी केल्यास आपले ओळखपत्र दाखवावे लागेल.

३) मूळ ओळखपत्र हरविल्यास आवश्यक शुल्क भरून दुय्यम ओळखपत्र दिल्या जाईल.

शारीरिक प्रशिक्षण वर्ग

सर्व विद्यार्थ्यांना शारीरिक प्रशिक्षण वर्गाला उपस्थित राहणे व सत्रा अखेर घेतल्या जाणाऱ्या शारीरिक क्षमता चाचणी परीक्षा देणे अनिवार्य आहे. परीक्षा न दिल्यास नियमानुसार दंड आकारण्यात येईल.

शिस्त :

- शैक्षणिक व कार्यालयीन कामकाज सुरळीतपणे चालण्यासाठी महाविद्यालयाने घालुन दिलेल्या नियमांचे सर्व विद्यार्थ्यांनी पालन करावे.
- महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वातावरण स्वच्छ ठेवण्यासाठी शिस्त पाळावी.
- महाविद्यालयाच्या प्रशासकीय कार्यामध्ये अडथळा निर्माण होईल किंवा महाविद्यालयाची प्रतिमा डागावेल अशा प्रकारचे कोणतेही कृत्य
- विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरामध्ये/परिसराबाहेर करू नये. तसेच प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे राजकीय किंवा अन्य (महाविद्यालयाशी संबंधीत नसलेल्या) व्यक्तीच्या नावाचा किंवा प्रभावाचा महाविद्यालयीन कामकाज करून घेण्यास अवलंब करू नये.
- ग्रंथालयातील पुस्तके, फर्निचर, प्रयोगशाळेतील साहित्य किंवा इतर साहित्याचा काळजीपूर्वक वापर करावा. महाविद्यालयाच्या मालमत्तेचे नुकसान केल्यास संबंधीत विद्यार्थ्याकडून नुकसान भरपाई वसुल केल्या जाईल.
- महाविद्यालयाची इमारत व परिसरामध्ये तंबाखु किंवा गुटखा खाण्यास सक्त मनाई आहे. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या विरूध्द कायदेशीर कार्यवाही केली जाईल.
- महाविद्यालयाच्या परिसरामध्ये रॅगींग करणाऱ्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. परीक्षेमध्ये गैरमार्गाचा अवलंब करणाऱ्या विरूध्द महाराष्ट्र शासन १९८२ च्या कलम ३१ व १९९४ च्या महाराष्ट्र विद्यापीठ कलमान्वये कार्यवाही केली जाईल.

उपस्थिती :

- विद्यापीठाच्या परीक्षांना बसण्याच्या पात्रतेसाठी प्रत्येक विद्यार्थ्याला शेकडा ७५ टक्के पेक्षा जास्त उपस्थिती प्रत्येक विषयात हजर राहणे जरूरी आहे.
- ए.टी. के. टी. सवलतीबाबत बि. ए. भाग २ आणि ३ मध्ये ए.टी. के.टी. च्या आधारे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मागील नापास झालेल्या परीक्षेत कमीत कमी २ विषय सुट प्राप्त असणे आवश्यक आहे. (एन.ई.पी. व सी.बी.सी.एस. पद्धतीला लागू असणारे निर्देश विद्यार्थ्यांना अनिवार्य असतील)
- जे शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी परीक्षेला बसणार नाहीत व ७५: उपस्थिती राहणार नाही अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती न देण्याचा अधिकार प्राचार्यास राहील.

आचार संहिता :

१) महाविद्यालयीन तासिका सुरू असतांना विद्यार्थ्यांनी वर्गाभोवती किंवा परीसरामध्ये फिरू नये.

२) विद्यार्थ्यांचा पोषाख स्वच्छ व निट नेटका असावा.

३) इतर कुठल्याही ठिकाणी महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करित असतांना विद्यार्थ्यांची वर्तणुक/वागणुक महाविद्यालयाच्या प्रतिमेला हानी पोहचविणारी असू नये.

४) महाविद्यालयाच्या परिसरामध्ये बाहेरील व्यक्तीस घेऊन येवू नये.

५) विद्यार्थ्यांनी आपली व्यक्तीगत किंवा शैक्षणिक व इतर कोणतीही अडवण असल्यास त्याबाबत वर्ग शिक्षक, पर्यवेक्षक किंवा प्राचार्यांना भेटावे. ते अडचण सोडवतील किंवा मार्गदर्शन करतील.

६) प्राचार्यांची पूर्व लेखी परवानगी घेतल्याशिवाय विद्यार्थ्यांनी इतर विद्यार्थी किंवा बाह्य व्यक्तीकडून निधी गोळा करू नये.

७) प्राचार्याची पूर्व लेखी परवानगी शिवाय विद्यार्थ्यांना सहलीला जाता येणार नाही.
८) महाविद्यालयातील शिस्त विषयक अधिकार प्राचार्यांना असून या बाबत त्यांचा निर्णय अंतिम राहील व शिस्त भंग करणाऱ्या विरुध्द कडक कार्यवाही केल्या जाईल.
९) महाविद्यालयाच्या परिसरात कुठेही मोबाईलचा वापर करण्यास सक्त मनाई राहील. ह्याचे उल्लंघन, शिस्तभंग समजले जाईल व संबंधित विद्यार्थ्यां विरूध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
१०) वरील आचारसंहीतेचा भंग करणाऱ्या विद्यार्थ्याला महाविद्यालयाच्या नियमाप्रमाणे दंडीत वा शासीत किंवा महाविद्यालयातून काढुन टाकले जाईल.
११) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (छएझ–२०२०) नुसार होणारे बदल सर्व अनिवार्य असतील.
टिप : वरील नियमामध्ये कुठलीही सुधारणा किंवा बदल करण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील.

सर्वसाधारण सूचना

ग्रंथालयासंबंधी नियम :

१) प्रत्येक विद्यार्थ्यनि ग्रंथालय परिसरामध्ये वावरतांना आपले ओळखपत्र सोबत ठेवावे व ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी मागणी केल्यास दाखविणे आवश्यक आहे.
२) ओळखपत्र व वाचक तिकीट (रिडर्स तिकीट) अहस्तांतरणीय आहेत.
३) ग्रंथालयातील पुस्तकांचा विद्यार्थ्यांनी अतिशय काळजीपूर्वक वापर करावा. पुस्तकातील पाने फाडणे, पुस्तकामध्ये विचित्र चित्र काढणे किंवा अश्लील मजकुर लिहीणे दंडनीय गुन्हा असून संबंधीत विद्यार्थ्यांविरूध्द कठोर कार्यवाही केल्या जाईल किंवा महाविद्यालयातून नाव कमी करण्यात येईल.

अध्ययन कक्ष :

१) विद्यार्थांनी ग्रंथालय अध्ययन कक्षामध्ये पूर्ण शांतता ठेवावी व शिस्तीचे पालन करावे.
२) विद्यार्थ्यांना पाठ्युस्तके, संदर्भग्रंथ आणि नियतकालिके ओळखपत्र दाखवून मिळतील परंतु अध्ययन कक्षा बाहेर घेवुन जाण्याची परवानगी दिली जाणार नाही.
३) विशेष संदर्भाकरिता विद्यार्थ्यांनी ग्रंथपालाला भेटावे.
४) रिडर्स तिकीटाच्या मागील बाजुवरील सर्व सूचना विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक वाचुन त्याचे वेळीच पालन करावे.
५) पुस्तके निर्धारीत केलेल्या वेळेपूर्वी परत करावे. पुस्तके निर्धारीत वेळेत जमा न केल्यास पहिल्या आठवड्यतील प्रत्येक दिवसाला एक रूपया या प्रमाणे त्यानंतर प्रत्येक दिवस मोठ्य प्रमाणात फाडतोड केलेली असल्यास प्रत्येक दिवसाला दहा रूपये प्रमाणे दंड आकारल्या जाईल.
६) दंड आकारतांना सुट्टीचे दिवसाला सुध्दा दंड आकारल्या जाईल.
७) फक्त पाठ्युस्तकेच घरी वाचण्यासाठी दिले जातील.
८) वरील नियमाच्या उल्लंघनाबाबत प्राचार्यांना कळविले जावे व याबाबत ते योग्य ती कार्यवाही करतील.

राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) :

वरिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांना या योजनेत भाग घेता येईल. कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार संपूर्ण शैक्षणिक सत्रात कमीत कमी १२० तास समाजकार्य करावे लागेल. याशिवाय विशेष शिबीरात काम करावे लागेल. या व्यतिरिक्त रक्तदान शिबीर, प्रौढ शिक्षण, रस्ते विकास कार्यक्रमात भाग घेणाऱ्या विद्याथ्यास प्रोत्साहनपर जास्तीत जास्त १० गुण दिले जातील. या गुणांचा फायदा विद्यार्थ्यांना संपूर्ण आयुष्यभर मिळतो. एन. एस.एस. साठी फॉर्म रितसर भरून कार्यक्रम अधिकारी यांचेकडून प्रवेश घ्यावा. टिप (NEP) नुसार गुणा संदर्भातील बदल सर्वांना अनिवार्य असतील.

खेळ :

खेळामध्ये आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या खेळामध्ये भाग घेण्यासाठी महाविद्यालयाद्वारे नेहमी प्रोत्साहन दिल्या जाते. विद्यापीठ स्तरावर महाविद्यालयाचे खेळाडू दरवर्षी निवडल्या जातात. खेळामध्ये अभिरूची असणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण विभागाशी संपर्क साधावा.

सांस्कृतिक उपक्रम :

महाविद्यालयामध्ये दरवर्षी सांस्कृतिक उपक्रमांतर्गत विविध स्पर्धा जसे वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा, गटचर्चा, परिसंवाद, स्नेहसम्मेलन इत्यादी उपक्रम आयोजित केले जातात. या उपक्रमातील सहभागामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. विद्यापिठस्तरीय युवक महोत्सवामध्ये पाठविण्यात येते. युवक महोत्सव व इतर सांस्कृतिक उपक्रमामध्ये सहभाग घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व संधी महाविद्यालयाद्वारे उपलब्ध करून दिली जाते.

– विशेष उपक्रम –

वैद्यकीय चाचणी	विद्यार्थी कल्याण योजना	भ्रष्टाचार निर्मूलन	स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन	व्यसनमुक्ती उपक्रम
रक्तदान शिबीर	गांजर गवत निर्मूलन	आरोग्य शिबीर	सहल अभ्यास दौरा	रक्तगट चाचणी शिबीर
वृक्षारोपण	प्रौढ शिक्षण	करिअर कटटा		

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या विद्यार्थी हितार्थ योजना :

१) संत गाडगे बाबा कमवा आणि शिका योजना २) संत गाडगे बाबा शुद्ध पेयजल योजना ३) संत गाडगे बाबा विद्याधन योजना ४) विद्यापीठ विद्यार्थी दायीत्व निधी योजना महाविद्यालय विद्यार्थी दायित्व निधी योजना ५) संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजना ६) संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजना ७) संत गाडगे बाबा विद्यार्थी विकास निधी योजना ८) स्व. प्रा. रामप्रकाश शामलालजी राठी स्मृति योजना ९) कौशल्य विकास योजना १०) संत गाडगे बाबा सायकल योजना ११) विद्यार्थी सुरक्षा विमा १२) विविध पुरस्कार

शिष्यवृत्ती व शुल्क सवलत :

गरजु व लायक विद्यार्थ्यांसाठी अनेक शिष्यवृत्ती व शुल्क सवलतीच्या योजना आहेत. विद्यार्थ्यांना फक्त एकच शिष्यवृत्ती किंवा फी सवलत दिली जाते. खालील शिष्यवृत्ती योजना आणि शुल्क सवलती बाबतची सविस्तर माहिती कार्यालयात मिळू शकते.

भारत सरकार शिष्यवृत्ती :

फ्री शिप :

१) ज्या विद्यार्थांना कुठल्याही प्रकारची भारत सरकार शिष्यवृत्ती किंवा ई.बी.सी. सवलत मिळत नसेल, त्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाल शिक्षण शुल्क भरावे लागेल.
२) ज्या विद्यार्थ्यांनी भारत सरकार शिष्यवृत्ती अर्ज, ई.बी.सी. सवलत अर्ज महाविद्यालयामध्ये भरले नसतील अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे शिक्षण शुल्क भरावे लागेल.
३) अनु. जाती, अनु. जमाती, भटके विमुक्त व इतर मागासवर्गीय जातींकरीता भारत सरकार शिष्यवृत्ती योजना.
४) राज्यसरकारची ओपन मेरीट स्कॉलरशिप.
५) राष्ट्रीय मेरिट स्कॉलरशिप.
६) नॅशनल लोन स्कॉलरशिप.

७) शारीरिक दृष्ट्य अपंग विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती.
८) स्वातंत्र्य सैनिक शिष्यवृत्ती.
९) माजी सैनिकांच्या मुलांकरिता शिष्यवृत्ती.
१०) पंतप्रधान विद्यालक्ष्मी योजना

१) ई.बी.सी. फ्री शिप.
२) एक वेळ अनुत्तीर्ण झालेल्या अनु. जाती, अनु. जमाती भटक्या व विमुक्त व मागासवर्गीय जातींच्या विद्यार्थ्यांकरिता फ्री शिप.
३) प्राथमिक शिक्षण शुल्क सवलत.

प्रोत्साहनपर गुण :

अमरावती विद्यापीठाचे अध्यादेश क्र. १/८५ नुसार अभ्यासेत्तर कार्यक्रमामध्ये भाग घेणाच्या वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर जास्तीत जास्त १० गुण दिले जातात.

अ.क्र.	शालेय उपक्रम
१)	राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभाग १२० तासिका
	एका शिबीरामध्ये सहभाग
	दोन शिबीरामध्ये सहभाग
२)	महाविद्यालयीन स्पर्धेमध्ये सहभाग
	महाविद्यालयीन शालेय स्पर्धेमध्ये सहभाग
	विद्यापीठ पुरस्कृत केंद्रावरील विविध सांस्कृतिक स्पर्धेमध्ये सहभाग (प्रत्येक स्पर्धेसाठी)
३)	विद्यापीठ स्तरावरील सांस्कृतिक स्पर्धेमध्ये सहभाग
	विद्यापीठ स्तरावरील क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग
४)	रक्तदान (जास्तीत जास्त ५ गुण)
५)	राज्य सरकारच्या योजनेसाठी आवश्यक असेलली महत्वपूर्ण व इतर सांख्यिकीय माहिती गोळा करणे.
६)	गृहरक्षक (होमगार्ड)
७)	विद्यार्थ्यांच्या साहित्य/निबंधलेखनास राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिक मिळाल्यास.
	राज्यस्तरीय पारितोषिक मिळाल्यास

टिप : विद्यापीठाच्या निर्देशानुसार प्रोत्साहनपर गुणांसंदर्भातील बदल सर्वांना लागु असतील.

❊ वार्षिक नियोजन ❊

जुन : प्रवेश प्रक्रिया/अध्यापनास सुरूवात/वेळापत्रक नियोजन
स्थानिक व्यवस्थापन समिती सभा
वार्षिक कार्यक्रम नियोजन सभा

जुलै : प्रवेश प्रक्रिया
व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा
आपातकालीन व्यवस्थापन कार्यक्रम
उद्बोधन वर्ग (रा.से.यो.)
महाविद्यालयीन विविध समिती गठन.

ऑगस्ट : क्रीडा स्पर्धामधील सहभाग
- ❊ विद्यापीठीय सांस्कृतिक कार्यक्रम.
- ❊ महाविद्यालयीन सांस्कृतिक कार्यक्रम.
- ❊ सद्भावना रॅली/वैचारिक व्याख्यान.
- ❊ प्रथम घटक चाचणी
- ❊ वृक्षारोपणध्वृक्ष दिंडी, पथनाट्य (रा.से.यो.)
- ❊ अभ्यास मंडळांच्या कार्यकारणीचे गठन/अभ्यास मंडळांचे उद्घाटन.

सप्टेंबर :
- ❊ द्वितीय घटक चाचणी.
- ❊ अभ्यास क्रमाशी संबंधीत संस्थांना भेटी
- ❊ साक्षरता दिंडी (रा.से.यो.)
- ❊ क्रीडा स्पर्धामधील सहभाग
- ❊ सहल आयोजन/विद्यार्थी परिषद सचिवाची निवड.
- ❊ व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा.
- ❊ सेवाभावी संस्थांच्या भेटी.
- ❊ वैचारीक व्याख्यान

ऑक्टोबर :
- ❊ प्रथम सत्रांत परीक्षा/पालक मेळावा
- ❊ स्थानिक व्यवस्थापन समिती सभा
- ❊ युवक महोत्सव सहभाग
- ❊ युवक स्वयंरोजगार मार्गदर्शन व्याख्यान.
- ❊ प्रबोधनात्मक कलापथकाचे सादरीकरण (रा.से.यो.)
- ❊ रा.से.यो. विविध कार्यक्रम (गांधी जयंती)
- ❊ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा

नोव्हेंबर :
- ❊ अभ्यासक्रमाशी संबंधित वक्तृत्व स्पर्धा आयोजन/चर्चा सत्राचे आयोजन.
- ❊ अभ्यास दौरा.
- ❊ संबंधीत संस्थांना भेटी
- ❊ विषयाअंतर्गत विविध व्याख्यानांचे आयोजन.
- ❊ जलसंवर्धन मार्गदर्शन कार्यशाळा.

डिसेंबर :
- ❊ अभ्यास मंडळांच्या अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन.
- ❊ ग्रंथालय उपयोगीता मार्गदर्शन कार्यशाळा.
- ❊ वादविवाद स्पर्धा आयोजन.
- ❊ विशेष शिबीर.
- ❊ एड्स प्रतिबंधात्मक कार्यक्रमाचे आयोजन.
- ❊ महाविद्यालयीन सांस्कृतिक कार्यक्रम.
- ❊ तृतीय घटक चाचणी.

जानेवारी :
- ❊ रक्तदान शिबीर व रक्तगट तपासणी कार्यक्रम.
- ❊ परिसर स्वच्छता कार्यक्रम.
- ❊ सहल आयोजन.
- ❊ चतुर्थ घटक चाचणी
- ❊ महिला सक्षमीकरणाचे कार्यक्रम.

फेब्रुवारी :
- ❊ अंधश्रध्दा निर्मूलन कार्यक्रम.
- ❊ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा.
- ❊ युवा सप्ताह.
- ❊ स्नेह संमेलन.
- ❊ चतुर्थ घटक चाचणी विषय निहाय प्रात्यक्षिक परीक्षा.
- ❊ अभ्यास क्रमाच्या अनुषंगाने कार्यक्रमाचे आयोजन. व्यक्तिमत्वविकास कार्यक्रम.
- ❊ महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचे आयोजन.
- ❊ स्थानिक व्यवस्थापन समिती सभा.

मार्च :
- ❊ वार्षिक सराव परीक्षा.
- ❊ वार्षिक विशेषांक प्रकाशन.
- ❊ सत्रामध्ये केलेल्या कार्याचा अहवाल सादरीकरण.
- ❊ विषय निहाय प्रात्यक्षिक परीक्षा.
- ❊ विद्यापीठ परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम.
- ❊ बक्षिस वितरण कार्यक्रम.
- ❊ निरोप समारंभ.

Cover Last Plain